R.P. 18-19

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue - LXXIII

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

PRINCIPAL
Nutan Mahavidyalay
SELU, Dist. Parbhani

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरुप आणि जनमानस

प्रा. राजाराम झोडगे,
नूतन महाविद्यालय,सेलू.
जि.परभणी
मो.9420786972
E-mail- rajanzodge@gmail.com

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

आजच्या काळात प्रसारमाध्यमांचे महत्त्व नव्याने सांगण्याची गरज नाही. व्यक्ती-व्यक्तींमधील संपर्क, माहिती, घडामोडी, नवनवीन शोध, शासकीय निर्णय, धोरणे आदी बाबी समाजात पोहंचवायच्या असतील किंवा घरबसल्या आपल्याला मिळवायच्या असतील तर प्रासरमाध्यमांसारखे दुसरे साधन नाही. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशामध्ये तर माध्यमांची गरज अधिकच ठळकपणे अधोरेखित होते. माध्यमांनीही सर्वत्र आपले अस्तित्त्व दाखवून दिले असून आपली व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढवली आहे. कुठलीही बाब ही आता 'गुपित', 'राज' राहत नाही. हे 'विकिलिक्स' ने दाखवून दिले आहे. जनमानसांवरही या माध्यमांचा प्रचंड पगडा निर्माण झाला आहे. त्यामुळे चालू काळाला 'माध्यमांचे युग' म्हणूनही संबोधले जाते आहे. एकेकाळी एकमेव वा केंद्रिभूत माध्यम राहिलेल्या वृत्तपत्रांबरोबरंच आज टी.व्ही., रेडियो, इंटरनेट, सोशल मीडिया अशा प्रकारच्या माध्यमांनी आपले स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण केले आहे. आज बदलत्या कालप्रवाहात माध्यमांचे प्रकार वाढले तसे त्यांच्या स्वरुपातही बदल झालेले दिसतात.

जेम्स ऑगस्टस हिकीच्या 'बेंगाल गॅझेट' या भारतातील पहिल्या वृत्तपत्राचा उदय होऊन आज जवळपास 237 वर्षे लोटली. स्वातंत्र्यपूर्वकाळात इंग्रजी सत्तेविरुद्ध जनमत घडवण्यासाठी, समाजसुधारणेसाठी अनेक समाजधुरिणांनी वृत्तपत्राचा शस्त्र म्हणून वापर केला. स्वातंत्र्योत्तर काळातही देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठीच्या प्रयत्नांत वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. अन्यायाला वाचा फोडणे, चुकीची धोरणे, वर्तन यांचा विरोध करणे, सत्प्रवृत्तींना प्रोत्साहन, प्रेरणा देणे, घटनेचे वास्तव चित्रण करुन तटस्थपणे विश्लेषण करणे, सत्य समोर आणणे यांतून वृत्तपत्रांनी जनमानस घडवण्याचे मोठे कार्य केले आहे. या सर्व बाबी तसेच सहज उपलब्धता, अल्पमूल्य यांमुळे इंटरनेटच्या युगातही जनसामान्यांचे माध्यम म्हणून वृत्तपत्राचे स्थान अबाधित राहिले.

वृत्तपत्रांची लोकप्रियता, स्थानिक गरज, या क्षेत्रातील व्यवसायाचे गणित, स्पर्धा यामुळे वृत्तपत्रांची संख्याही आज वाढताना दिसते आहे. पूर्वी बड्या शहरांमधूनच वृत्तपत्रे निघत आज मात्र जिल्हा, तालुक्यांच्या गावांतूनही वृत्तपत्रे छापली जाऊ लागली आहेत. भारतीय वृत्तपत्र नोंदणी कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.RNI.nic.in) सन 2015-16 या वर्षीच्या भारतातील वृत्तपत्रांसंबंधीचा गोषवारा दिला आहे; त्यानुसार 31 मार्च 2016 पर्यंत 1,10,851 प्रकाशने (वृत्तपत्र व नियतकालिके) नोंदणीकृत झाली आहेत. ही संख्या मागच्या म्हणजेच 2014-15 च्या तुलनेत 5.13 टक्के अधिक आहे. एका वर्षात पाच टक्क्यांहून अधिक होणारी वृद्धी ही वृत्तपत्रांच्या वाढत्या संख्येकडे आपले लक्ष वेधते. भारतात उत्तरप्रदेश हे सर्वात जास्त वृत्तपत्रे नोंद असलेले (16984) राज्य असून त्यानंतर दुसरा क्रमांक महाराष्ट्राचा लागतो (15260) लागतो.



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November 2018

परिवर्तन हा जगाचा नियम आहे. त्यानुसार वृत्तपत्रे बदलत गेली. वृत्तपत्रांच्या वाढत्या संख्येबरोबरच कृष्णधवल ते आजच्या बहुरंगी छपाईपर्यंतचा बदलही आपण पाहतो आहोत. आज ई-आवृत्ती निघत आहेत. वर्तमानपत्राच्या बाह्यस्वरुपाबरोबरच अंतर्गत स्वरुपातही अनेक बदल झालेले दिसतात. वाचकाभिमुखता, विविध सदरं, अधिकाधिक समावेशकता, भाषा, साहित्य, क्रीडा, संस्कृती, प्रादेशिक-स्थानिक गरजा यांना स्थान, सामाजिक उपक्रम हे सकारात्मक बदल निश्चितच स्वागतार्ह आहेत. परंतु आपआपसातील स्पर्धेतून भडक, अतिरंजित, एकतर्फी बातम्या देणे, पेडन्यूज, विविध राजकीय पक्ष, संघटना, जाती, धर्म यात विभागले जाणे, जाहिरातींचा अतिरेक अशा बाबी माध्यमक्षेत्राला वेगळ्या दिशेने घेऊन जाणाऱ्या ठरतात.

आज वर्तमानपत्र हातात घेतल्यास पहिल्याच पानावर खून, दरोडे, बलात्कार, अपघात, फसवणूक अशा बातम्या असतात. वृत्तपत्र हे समाजाचा आरसा असते समाजात जे घडते तेच ते दाखवते हे मान्य परंतु समाजात खून, बलात्कार वा तत्सम बाबींपेक्षा वेगळे, चांगले काही घडतच नाही का? नवनवीन संशोधन, यश, जिद्द, सामंजस्य, ऐक्य, माणुसकी इ. बाबी अंतर्भूत असलेल्या सकारात्मक बातम्या पहिल्या-दुसऱ्या पानावर क्वचितच दिसतात. विविध राजकीय पक्ष, संघटना, विचारसरणी यात विखुरल्या गेलेल्या चार वर्तमानपत्रांत एकच बातमी जेव्हा वेगवेगळ्या पद्धतीने छापलेली असते तेव्हा सर्वसामान्य वाचकाने नेमके कोणते सत्य समजायचे?

स्थानिक पातळीवरुन प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधी प्रशिक्षित, माध्यमक्षेत्रांचे गांभीर्य असलेले असतात का? बातमीची सत्यासत्यता पडताळून पाहिली जाते का? कुणाची आणि कुठली बातमी छापायची हे समोरचा माणूस पाहून ठरवले जाते का? एखादी बातमी छापणे आणि छापून आणणे यांतील सीमारेषा अंधूक होते आहे का? या बाबींकडे माध्यमांनी गांभीर्याने पाहणे गरजेचे वाटते.

अनेक वृत्तपत्रांची अवस्था बातम्या कमी आणि जाहिराती जास्त अशी झालेली दिसते. व्यवसायाची गरज म्हणून जाहिराती आवश्यकच ठरतात. मात्र त्या हव्यासापायी जाहिरातीची सत्यासत्यता, भडकपणा, समाजावरील परिणाम यांचा विचार न करता त्या देणे म्हणजे आपल्याच वाचकांशी प्रतारणा करणे होय असे वाटते. कारण, माध्यमांचा समाजमनावर प्रभाव असतो. शिवाय सगळेच वाचक बातम्या व जाहिरातींकडे नीरक्षीर विवेकाने पाहतातच असे नाही याचाही विचार बदलत्या माध्यमांनी करायला हवा. अर्थात सगळीच वृत्तपत्रे अशाच पद्धतीने बदलत आहेत असे नाही. याला अनेक अपवाद असतीलही परंतु बदल आणि व्यावसायिकतेच्या नावाखाली माध्यमांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहू नये याची काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे ठरते.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या वृत्तपत्रांनी आजवर काळानुरुप अनेक बदल आत्मसात केले असून त्याचा ई-अवतार आजच्या तरुणाईमध्ये लोकप्रिय होतोय. भविष्यात मुद्रित वृत्तपत्र वाचण्याऐवजी मोबाईल, टॅब, संगणक इ.वर ई-पेपर वाचणाऱ्यांची संख्या वाढतच जाईल यात शंका नाही.

वृत्तपत्रांप्रमाणेच दूरचित्रवाणी (टी.व्ही.) हे एक महत्त्वाचे प्रसारमाध्यम. दृकश्राव्य असल्याने साक्षरांबरोबरच निरक्षरांमध्ये ते लोकप्रिय ठरते. ग्रामीण भागात पूर्वी दूरदर्शन हे एकमेव चॅनेल दिसत असे. त्यावर दिवसांतून ठराविक वेळा दिली जाणारी बातमीपत्रे हीच सामान्यजनांसाठी माहितीचे स्रोत असत. आज मात्र टेलिव्हिजन क्षेत्रात क्रांती झाली आहे. अनेक खाजगी तसेच सरकारी वृत्तवाहिन्या या क्षेत्रात आल्या आहेत. सॅटेलाईटच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण, केबल व्यावसायिकांकडे सुद्धा उपलब्ध झालेले टी.व्ही.संच यामुळे या माध्यमाची जनमानसावरील आपली पकड घट्ट होत आहे. मराठी, हिंदी,

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani

इंग्रजी तसेच इतर प्रादेशिक भाषांतील विविध वृत्त व मनोरंजन वाहिन्यांनी टी.व्ही.ला पडदा व्यापून टाकला आहे.

टी.व्ही. माध्यमाच्या दृकश्राव्य स्वरुपामुळे घडलेली घटना प्रत्यक्ष पाहणे, संबंधित व्यक्तींची प्रतिक्रिया थेट ऐकणे, प्रत्यक्ष घटनास्थळावरील संदर्भ, माहिती, प्रतिनिधीचे विश्लेषण इ.मुळे या माध्यमाची विश्वासार्हता व लोकप्रियता वाढतांना दिसते आहे. मात्र व्यवसायाचे गणित, टी.आर.पी.ची स्पर्धा यातून या क्षेत्राचे बदलते स्वरुपही सर्वसामान्यांना कंटाळवाणे ठरते आहे. त्याच त्या बातम्या दिवसभर दाखवणे, टी.आर.पी.साठी प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी भडक, अतिरंजित बातम्या दाखवणे, पाल्हाळिकपणा, ब्रेकिंग न्यूज, एक बातमी आणि दहा जाहिराती यांमुळे अशा चॅनेल्सवरील वृत्त, कार्यक्रम पाहणे म्हणजे निव्वळ वेळेचा अपव्यय अशा निष्कर्षापर्यंत प्रेक्षक येत आहेत.

एखादी बातमी दाखवतांना त्याचे सामाजिक, राजकीय परिणाम काय होतील याचा विचार माध्यमांकडून केला जातो का? की निव्वळ टी.आर.पी.चे गणितच समोर ठेवले जाते असाही प्रश्न दर्शकांना पडू लागला आहे. 2007 साली मुंबईत हॉटेल ताज वर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या वेळी लाईव्ह दृश्ये दाखवणाऱ्या चॅनेल्समुळे दहशतवाद्यांना मिळत गेलेली माहिती आणि पोलिसांना बचावकार्यात येणारे अडथळे सर्वांच्याच स्मरणात आहेत. दोन गटांतील भांडणे, दंगली, भूतकाळातील समाजविघातक घटना पुन्हा-पुन्हा दाखवून लोकांची माथी तर भडकत नाहीत ना ? सामाजिक स्वास्थ्य तर बिघडत नाही ना? याचा विचार माध्यमांनी करणे गरजेचे ठरते.

वृत्तवाहिन्यांवरील बातम्यांबरोबरच त्यावर वेगवेगळ्या शीर्षकाखाली होणाऱ्या चर्चा बरेचदा अतिशय कंटाळवाण्या असतात. चर्चेमध्ये सामान्यजनांचे प्रतिनिधी म्हणून त्याच त्या व्यक्ती बसलेल्या दिसतात. त्यातील बऱ्याचजणांचे एखाद्या बाबी, विचारासंबंधीचे पूर्वग्रह, द्वेष त्यांच्या वक्तव्यातून समोर येतांना जाणवतात. इतरांना बोलू न देणे, माझेच तेवढे खरे हे पटवण्यासाठी मोठमोठ्याने बोलणे, वैयक्तिक चिखलफेक करणे असे प्रकार चालू असतात. कार्यक्रमाचे संयोजन करणारे माध्यमांचे प्रतिनिधी/अँकर एखाद्या घटनेविषयी एकतर्फी शीर्षक देणे, समोरच्याला प्रश्न विचारतांना आपल्याला हवे तसेच उत्तर मिळेल अशा आशयाचा प्रश्न विचारणे, त्या दिशेने चर्चा वाहवत नेणे, एखाद्याला आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी न देणे या बाबी दर्शकांच्या लक्षात आल्यावाचून राहत नाहीत. अर्थात सर्वच वृत्तवाहिन्यांवर असे होते असे नाही. अनेक वृत्तवाहिन्या निष्पक्षपणे आपले कार्य करतांना दिसतात. काही वाहिन्यांनी सर्वसामान्यांनाही आपली मते माध्यमांसमोर मांडता यावी यासाठी व्हिडीओ ब्लॉग, व्हॉटसॲप ग्रुप सुरु केले आहेत. मात्र या प्रतिक्रियांची दखल ही माध्यमे किती आणि कशाप्रकारे घेतात हे त्यांचे त्यानांच माहीत.

समाजमाध्यम (Social Media) हे आजच्या काळातील वेगाने विस्तारणारे असे लोकप्रिय माध्यम आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत, स्त्रियांपासून पुरुषांपर्यंत सर्वांनाच या माध्यमाने भुरळ घातली आहे. व्हॉटस्ॲप, फेसबुक, ट्विटर, ब्लॉग इ. माध्यमातून लोकांना अभिव्यक्त होता येऊ लागले आहे. आपले विचार, भावना, लेखन स्वतंत्रपणे मांडता येऊ लागले आहे. आज व्हॉट्सॲपवर एका सेकंदाला 400 दशलक्ष तर फेसबुकवर एका सेकंदाला 100 दशलक्ष संदेशांची देवाणघेवाण होते. 140 दशलक्ष लोक ट्विटरचा वापर करतात आणि दिवसेंदिवस ही संख्या वाढतेच आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातील घटना, बातमी काही क्षणांत सोशल मिडियातून व्हायरल होऊ लागली आहे. आपल्या विचार, मतांना मिळणारा

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 : UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

तात्काळ प्रतिसाद (लाईक, कॉमेंट) पाहता या माध्यमातून लेखन करणाऱ्यांची संख्याही वाढू लागली आहे.

समाजमाध्यमांची वाढती व्याप्ती व लोकप्रियता लक्षात घेता राजकारण्यांचे, कार्यकर्त्यांचे याकडे लक्ष गेले नसते तरच नवल. विविध पक्षांचे नेते, मंत्री, सामाजिक कार्यकर्ते, संघटना यांनी या माध्यमाचा उपयोग करायला सुरुवात केली. आज शासनाचे विविध विभाग, मंत्री, खाजगी संस्था यांचे फेसबुक, ट्विटर पेज उपलब्ध असून त्यामाध्यमातून संपर्क, देवाण-घेवाण सुरु असते.

कुठल्याही साधन, माध्यमाची उपयुक्तता, महत्त्व हे त्याचा वापर आपण कसा आणि कशासाठी करतो यावर अवलंबून असते. समाजमाध्यमाच्या बाबतीतही ही बाब महत्त्वाची ठरते. संपर्क, माहिती, ज्ञान, अभिव्यक्ती यांसाठी समाजमाध्यमे ही अतिशय महत्त्वपूर्ण ठरतात हे तर खरेच परंतु 'अतिपरिचयात् अवज्ञा' नुसार समाजातील काही घटकांकडून या माध्यमांचा दुरुपयोग होताना दिसतो आहे. त्यातून नवेच प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत.

समाजमाध्यमांवर संदेश टाकतांना जबाबदारी, परिणाम, नैतिकता यांचा विचार न करता व्यक्त होण्याचे, संदेश फॉरवर्ड करण्याचे प्रमाण वाढत आहे. जाती, धर्म, पंथ, संप्रदायविषयक संदेश, बदनामीकारक संदेश, चुकीची, अर्धवट माहिती या माध्यमांवर टाकली जाते. त्यावर कुठलाही धरबंध, तार्किकता लक्षात न घेता लाईक, कॉमेंट केले जाते. या माध्यमांवरील मजकूरासाठी कुठलीही सेन्सॉरशिप, नियमन नसल्यामुळे बेजबाबदारपणा वाढतांना दिसतो आहे. अतिशय उथळ, उच्छृंखल मजकूर कसलाही विचार न करता या माध्यमांमधून फिरत राहतो. चिकित्सक, विचारी लोक याकडे दुर्लक्ष करतील मात्र फारसा विचार न करणारी, माहिती नसलेली माणसे या अर्धवट मजकूरावरच आपले मत बनवू लागले आहेत. ज्याचा विपरीत परिणाम समाजस्वास्थ्यावर होतो. ज्यातून जातीय, धार्मिक, द्वेष, हिंसाचार, तेढ, तंटे निर्माण होऊ शकतात.

समाजमाध्यमांवर टाकले जाणारे मजकूर, विनोद, चुटकुले यांतून लोकप्रतिनिधी, शिक्षक, वडील, स्त्रिया यांच्याविषयी अवमानकारक, गलिच्छ शब्द वापरले जातात. गरज नसतांनाही वैयक्तिक, खाजगी माहिती चुकीच्या पद्धतीने सार्वजनिक केली जाते. आपली लायकी, ज्ञान, समज, वय यांचा कुठलाही धरबंध न ठेवता चुकीच्या माहितीच्या आधारे मुख्यमंत्री, पंतप्रधान, मंत्री वा तत्सम उच्च पदावरील व्यक्ती, प्रतिनिधी यांची खिल्ली उडवली जाते. खालच्या पातळीवरील विनोद टाकले जातात. एखाद्या धोरणावर, निर्णयावर टीका, समीक्षा करण्याचा आपल्याला अधिकार आहे मात्र संबंधित पदावरील व्यक्ती ही केवळ एक व्यक्ती नूसन ती संबंधित समाजाचे, राज्याचे, आपल्या सर्वांचे, देशाचे प्रतिनिधित्व करणारी, घटनात्मक पदावरील अधिकारी, प्रतिनिधी आहे याचेही भान ठेवले जात नाही.

समाजमाध्यमांवर अलीकडे ट्रोलिंग ही एक नवीन विकृती झपाट्याने वाढते आहे. एखाद्या व्यक्तीने अभिव्यक्त केलेल्या विचार, मताचा सामूहिकपणे विरोध करणे, त्या विचारांवर हल्ला करणे, संबंधित व्यक्तीला धमक्या, शिव्या देणे, नामोहरम करणे, विरोधात कुत्सित, अवमानकारक मजूकर पसरवणे अशा बाबी होऊ लागल्या आहेत. या झुंडशाहीला ट्रोलिंग करणे असे म्हटले जाते. एखादी घटना, विचार समजून घेऊन त्यात चुकीचे असेल तर विचारांनी विरोध करणे संयुक्तिक ठरेल मात्र विषय समजून न घेता अर्धवट माहितीच्या आधारे, द्वेषापोटी ट्रोल करणे, विचारांपेक्षा व्यक्तीला विरोध करणे व त्रास देणे, चारित्र्यहनन करणे ही बाब अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करणारी ठरते.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

ISSN :
2348-7143
November-2018

दिल्ली विद्यापीठातील एका कार्यक्रमातील गोंधळासंदर्भात गुरमेहर कौर या विद्यार्थिनीने टाकलेल्या पोस्टवर अशाच ट्रोलिंगच्या माध्यमातून टीकेची राळ उडवण्यात आली. गलिच्छ शिव्या, बलात्काराच्या धमक्या देण्यात आल्या. दंगल सिनेमातून प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या झायरा वसीम या मुलीला सिनेमात काम केल्यामुळे व मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांच्यासोबतच्या भेटीचे फोटो सोशल मिडियावर शेयर केल्यामुळे समाजमाध्यमातून ट्रोलिंग करुन हैराण केले गेले. इतके की शेवटी तिला माफी मागावी लागली. या उदाहरणांतून ट्रोलिंगच्या माध्यमातून होणारे मानसिक दमन, खच्चीकरण, अभिव्यक्तीस्वातंत्र्याची मुस्कटदाबी अशा विघातक बाबी प्रकर्षाने समोर येतात.

समाजमाध्यमांतील विकृतीवर अलीकडे पोलीस प्रशासनही लक्ष देते आहे. मात्र केवळ कायद्याच्या धाकाने ही समस्या सुटणार नाही त्यासाठी लोकांचे स्वयंनियमनही तेवढेच आवश्यक आहे. नागरिकांनी हक्क स्वातंत्र्याबरोबरच जबाबदारी, कर्तव्याची जाणीवही सतत ठेवली पाहिजे. सगळेच समाजमाध्यमांचा दुरुपयोग करताहेत असेही नाही. सकारात्मक विधायक वापराची अनेक उदाहरणे पहायला सापडतात. या माध्यमातून मांडलेले विचार, ब्लॉग, मते, लेख, काव्य यांची ग्रंथसंपदाही निर्माण होऊ लागली आहे. गरजूंपर्यंत मदत, माहिती पोहचू लागली आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या या काळात माध्यमांचे बदलते स्वरुप आणि त्याचा जनमानसावरील प्रभाव याचा विचार करता माध्यमांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. विविध भाषा, धर्म, पंथ, जाती-जमातीमध्ये विभागलेल्या समाजाला, देशाला एकसंध ठेवण्यासाठी, त्यांच्यात समन्वय साधण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते. मतभिन्नता असू शकते परंतु टोकाचा विरोधाभास नसावा. विरोधी भूमिकांमुळे समाजात गोंधळ होऊ नये. वाचक, दर्शकांकडे केवळ ग्राहक म्हणून न पाहता नागरिक म्हणून पाहणे गरजेचे आहे. सत्य, तटस्थता, निःपक्षपातीपणा, सामाजिक भान या मूल्यांना प्रमाण मानून समाजाला दिशा देण्याचे कार्य माध्यमांकडून व्हावे. आज अनेक माध्यमे निश्चितच चांगले कार्य करत आहेत. तटस्थपणे जागल्याची भूमिका वठवत आहेत. अनेक माध्यमे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण अशा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. त्यांचे विविधांगी उपक्रम कौतुकास्पद, प्रेरणादायी आहेत. शेवटी मी काही माध्यमांचा जाणकार, अभ्यासक नाही वा माध्यमशास्त्राचा विद्यार्थी नाही. एक सामान्य वाचक, नागरिक म्हणून मला जे वाटले ते येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या सत्तास्पर्धेच्या व अण्वस्त्रधारी युगात माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे हे निश्चित.

**संदर्भ :**

1. www.RNI.nic.in

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani